# 'नियमित प्रसिध्दी पत्रक'
# पोलीस अधीक्षक कार्यालय,उस्मानाबाद.
### सोमवार दि.१३/०२/२०२३

## "मोटार वाहन कायद्यांतर्गत कारवाई."

उस्मानाबाद शहर वाहतुक शाखा व संबंधीत पोलीस ठाण्यांनी महत्त्वाच्या रस्त्यांवर दि. १२ फेब्रुवारी रोजी मोटार वाहन कायदा- नियम भंग प्रकरणी **एकुण २४७ कारवाया करुन १,७६,७०० ₹ 'तडजोड शुल्क' वसुल केले आहे.**

## " अवैध मद्य विरोधी कारवाई ."

**परंडा पोलीस ठाणे :** भिमनगर, परंडा येथील- दिपक शिंदे हे दि.१२.०२.२०२३ रोजी २०.१८ वा. सु. खंडोबा चौक परंडा येथील लाकडी अड्याजवळ पत्रा शेडलगत अंदाजे १,८९० ₹ किंमतीची देशी विदेशी दारुच्या २१ सिलबंद बाटल्या अवैध विक्रीच्या उद्देशाने बाळगलेले असताना परंडा पो.ठा. च्या पथकास आढळले.

## " जुगार विरोधी कारवाई."

**मुरुम पोलीस ठाणे :** जुगार विरोधी कारवाई दरम्यान मुरूम पोलीसांनी दि.१२.०२.२०२३ रोजी १५.३० वा. सु. मुरुम पो.ठा.हद्दीत छापा टाकला. यावेळी महादेवनगर, मुरुम येथील- दत्ता बिराजदार, प्रोमद चव्हाण, हुसेन शेख,राम भोंडवे तर साठेनगर, मुरुम येथील- राजेंद्र देडे हे सर्व आनंदनगर येथील आष्टाकासार जाणारे बायपास रोडलगत चिंचेच्या झाडाखाली तिरट मटका जुगार चालवण्याच्या साहित्यासह २,००० ₹ रक्कम बाळगलेले आढळले.

**नळदुर्ग पोलीस ठाणे :** जुगार विरोधी कारवाई दरम्यान नळदुर्ग पोलीसांनी दि.१२.०२.२०२३ रोजी १८.५५ वा. सु. नळदुर्ग पो.ठा.हद्दीत छापा टाकला. यावेळी नळदुर्ग येथील- जाफर कुरेशी, अकील शेख, रसुल शेख, दिगंबर देडे, शुभम कांबळे हे सर्व तुळजापूर रोड गोलाई चौक नळदुर्ग येथे एका पत्रा शेडच्या पाठीमागे मोकळ्या जागेत तिरट मटका जुगार चालवण्याच्या साहित्यासह २,२९० ₹ रक्कम बाळगलेले आढळले.

यावरुन पोलीसांनी जुगार साहित्यासह रक्कम जप्त करुन नमूद व्यक्तींविरुध्द महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक कायदा कलम- १२ (अ) अंतर्गत सबंधीत पो.ठा. येथे स्वतंत्र २ गुन्हे नोंदवले आहेत.

## " मद्यपी चालकावर गुन्हा दाखल."

**मुरुम पोलीस ठाणे :** नागोबा गल्ली, येणेगुर ग्रामस्थ- श्रीकांत शामराव मंगरुळे दि.१२.०२.२०२३ रोजी २०.०० वा. सु. आपल्या ताब्यातील मोटरसायकल क्रं एमएच २५ एएच ०२४५ ही मुरुम मोड येथे रस्त्यावर मद्यधुंद अवस्थेत चालवून मो.वा.का. कलम- १८५ चे उल्लंघन केले. यावरुन पोलीसांनी सरकारतर्फे दिलेल्या प्रथम खबरेवरुन नमूद व्यक्तीविरुध्द गुन्हा नोंदवला आहे.

## "रहदारीस धोकादायरीत्या वाहन उभे करणाऱ्यावर गुन्हा नोंद."

**नळदुर्ग पोलीस ठाणे :**कुरेशी गल्ली, नळदुर्ग येथील- अन्वर मंजुर कुरेशी यांनी दि. १२.०२.२०२३ रोजी २३.३० वा. सु. आपल्या ताब्यातील ॲटो रिक्षा क्र. एम.एच. ०९ ए.बी. ९४२४ हा नळदुर्ग येथे बसस्थानक समोर एनएच ६५ जाणारे सार्वजनिक रस्त्यावर रहदारीस धोकादायरीत्या उभे केलेले असताना नळदुर्ग पोलीसांना आढळले.

**भुम पोलीस ठाणे :** समर्थनगर, भुम येथील- राजेंद्र चंद्रकांत ढगे यांनी दि. १२.०२.२०२३ रोजी १७.३० वा. सु. आपल्या ताब्यातील पिकअप क्र. एम.एच. २५ ए.जे. ०९०७ हा भुम येथे तहसिल कार्यालया समोर जाणारे सार्वजनिक रस्त्यावर रहदारीस धोकादायरीत्या उभे केलेले असताना भुम पोलीसांना आढळले.

यावरुन पोलीसांनी सरकारतर्फे दिलेल्या प्रथम खबरेवरुन नमूद व्यक्तीविरुध्द भा.द.स. कलम २८३ अंतर्गत सबंधीत पो.ठा. येथे २ गुन्हे नोंदवले आहेत.

**“ मारहान.”**

**वाशी पोलीस ठाणे :** जुन्या भांडणाचे कारणावरुन ईट, ता. भुम येथील- इमरान सत्तार पठाण यांना दि. १०.०२.२०२३ रोजी १८.०० वा. सु. ईट ते जातेगाव रोडवर भिमा यांच्या घरासमोर गावकरी- शंभु सुब्राव चव्हाण व अन्य २ यांनी ठार मारण्याच्या उद्देशाने संगणमताने इमरान यांना शिवीगाळ करुन इमरान यांच्या छातीवर डावे बाजूस व उजव्या हाताचे करंगळीवर चाकूने वार करुन जखमी केले. अशा मजकुराच्या इमरान पठाण यांनी दि.१२.०२.२०२३ रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन भा.दं.सं. कलम- ३०७, ३४ अंतर्गत गुन्हा नोंदवला आहे.

**मुरुम पोलीस ठाणे :** पाणी भरण्याच्या कारणावरुन आनंदनगर मुरुम, ता. उमरगा येथील- श्रीकृष्ण ऊर्फ सोन्या दत्तात्रय बनसोडे यांना दि. १२.०२.२०२३ रोजी ०७.०० वा. सु. आनंदनगर येथे पाण्याच्या टाकी जवळ गावकरी- सुधाकर बनसोडे, सुयश बनसोडे, पांडुरंग बनसोडे, शिवाजी बनसोडे व अन्य ३ यांनी संगणमताने शिवीगाळ करुन श्रीकृष्ण यांच्या डोक्यात, हातावर लोखंडी रॉडने, तलवारीने, काठीने मारहान करुन जखमी करुन ठार मारण्याची धमकी दिली. तसेच श्रीकृष्ण यांचे आई वडील त्यांच्या बचावास आले असता. त्यांनाही लाथाबुक्याने, काठीने मारहान केली. अशा मजकुराच्या श्रीकृष्ण बनसोडे यांनी दि.१२.०२.२०२३ रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन भा.दं.सं. कलम- ३२६, ३२४, ३४१, ३२३, १४३, १४६, १४७, १४९, ५०४,५०६, सह भा.ह.का. कलम ४,२५ अंतर्गत गुन्हा नोंदवला आहे.

**“ लैंगीक अत्याचार.”**

**लोहारा पोलीस ठाणे :** एका गावातील एक ३० वर्षीय महिला (नाव- गाव गोपनीय) दि. १२.०२.२०२३ रोजी ०१.०० ते ०२.०० वा.सु. आपल्या घरात असताना शेजारीच्या गावातील दोन तरुणाने त्या महिलेस गावातील तिच्या घरात असताना तीच्यावर लैंगीक अत्याचार केला. तसेच घडल्या प्रकाराची कोठे वाच्यता केल्यास तुला ठार मारुन टाकू अशी धमकी दिली. अशा मजकुराच्या पिडीतीने दि.१२.०२.२०२३ रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन भा.दं.सं. कलम- ३७६, ५०६, १०९, ३४ सह अ.जा.ज.कायदा कलम ३ (२)(व्हि), ३ (२) (व्हिए), ३(१) अंतर्गत गुन्हा नोंदवला आहे.

**“ मालमत्तेविरुध्द गुन्हे.”**

**मुरुम पोलीस ठाणे :** भुसणी, ता. उमरगा येथील-मल्लीनाथ माणिकराव हिरमुखे यांच्या भुसणी शिवारातील शेत गट १०४ मधील शेडचे दि. १०.०२.२०२३ रोजी २१.०० ते दि ११.०२.२०२३ रोजी ०७.०० वा.सु.कुलूप तोडून अंदाजे ६५,५०० ₹ किंमतीचा बीबीएफ पेरणी यंत्र, हरभऱ्याचे ७० किलो वजनाचे २ पोते, सोयाबीनचे ७० किलो वजनाचे ४ पोते, ज्वारीचे ६० किलो वजनाचे १ पोता, वायररांपचे एक बंडल, रेन पाईप बंडल १,खताचे १ पोते,पाईप फिटींगचे साहित्याचे १ पोते असा माल अज्ञात व्यक्तीने चोरुन नेला. अशा मजकुराच्या मल्लीनाथ हिरमुखे यांनी दि. १२.०२.२०२३ रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन भा.दं.सं. कलम- ४५७, ४६१, ३८०, ३४ अंतर्गत गुन्हा नोंदवला आहे.

**शिराढोण पोलीस ठाणे :** गवारे, ता. बीड येथील- जिवन बाबुराव कदम यांनी दि. १२.०२.२०२३ रोजी ०१.०० ते ०५.३० वा. सु. कळंब ते ढोकी जाणारे रोडवरील मंगरुळ शिवारातील हॉटेल येडेश्वरी येथे झोपण्यासाठी थांबले असता. मळी वाहतुक करणारे ट्रक क्रं एमएच ५०-२२६३ व ट्रक क्रं एमएच ५० एन १०९० या दोन्ही ट्रक मधील

अंदाजे २७,९०० ₹ किंमतीचे ३०० लिटर डिझेल अज्ञात व्यक्तीने चोरून नेले. अशा मजकुराच्या - जिवन कदम यांनी दि.१२.०२.२०२३ रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन भा.दं.सं. कलम- ३७९ अंतर्गत गुन्हा नोंदवला आहे.

**“ रस्ता अपघात.”**

**तुळजापूर पोलीस ठाणे :** जिजामाता नगर, तुळजापूर येथील- नितीन दत्तु लोंढे, वय ३८ वर्षे, हे दि. ११.०२.२०२३ रोजी १३.०० वा. सु. अजिंक्य रेसीडेन्सी कॉलनी नळदुर्ग रोड तुळजापूर रस्त्यावरुन पायी जात होते. दरम्यान अज्ञात वाहन चालकाने त्याच्या ताब्यातील वाहन हे निष्काळजीपने चालवल्याने नितीन यांना पाठीमागून धडक दिली. यात नितीन हे गंभीर जखमी होउन मयत झाले. या अपघातानंतर अज्ञात वाहन चालक अपघात स्थळावरुन वाहनासह पसार झाला. अशा मजकुराच्या मयताचा भाउ- शशिकांत दत्तु लोंढे यांनी दि. १२.०२.२०२३ रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन भा.दं.सं. कलम- २७९, ३०४ (अ), सह मो.वा.का. कलम- १८४, १३४ (अ) (ब) अंतर्गत गुन्हा नोंदवला आहे.

---

जनसंपर्क विभाग उस्मानाबाद पोलीस